पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ५

**सभावृत्तांत**

दिनांक - **०९/०६/२०१७** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **०९/०६/२०१७** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते - सभापती**
२. मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ - उपसभापती
३. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
४. मा.गावडे राजेंद्र तानाजी
५. मा.फुगे भिमाबाई पोपट
६. मा.बनसोडे राजू विश्वनाथ
७. मा.ॲड.भोसले सचिन सुरेश

या शिवाय मा.कडूसकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आला.**

विषय क्र.०१) मनपाची स्व.दत्तात्रय मरळ उद्यानातील व्यायामशाळा चालविण्यास देणेबाबत - मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.राजू बनसोडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.०२) खिंवसरा पाटील व्यायामशाळा चालविण्यास देणेबाबत - मा.सचिन भोसले, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.०३) मनपाची बाहुबली व्यायामशाळा, निगडी प्राधिकरण ही व्यायामशाळा चालविण्यास देणेबाबत – मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.सचिन भोसले यांचा प्रस्ताव.

विषय क्र.०४) मनपाची छत्रपती शिवाजी महाराज जलतरण व्यायामशाळा से.२६ आकुर्डी ही चालविण्यास देणेबाबत – मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.सचिन भोसले यांचा प्रस्ताव.

-----------

दिनांक २६/०५/२०१७ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.४)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

------------

**सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – १७ विषय क्रमांक - ०१

दिनांक - ०९/०६/२०१७

सुचक : मा.बाळासाहेब ओव्हाळ अनुमोदक : मा.राजू बनसोडे

संदर्भ : मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.राजू बनसोडे यांचा प्रस्ताव -

मनपाच्यावतीने पवनानगर, चिंचवड येथे स्व.दत्तात्रय मरळ उद्यान ही व्यायामशाळा चालविली जाते. मनपाची स्व.दत्तात्रय मरळ उद्यान व्यायामशाळा, पवनानगर चिंचवड ही व्यायामशाळा शंभूराजे मर्दानी खेळ विकास मंच, पुणे ही संस्था ११ महिने कराराने दरमहा र.रु.२,०००/- मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास घेण्यास इच्छुक आहे. तरी मनपाची स्व.दत्तात्रय मरळ उद्यान व्यायामशाळा, पवनानगर चिंचवड ही व्यायामशाळा शंभूराजे मर्दानी खेळ विकास मंच चिंचवड, पुणे – ३३ या संस्थेस ११ महिने कराराने दरमहा र.रु.२,०००/- मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १८ विषय क्रमांक - ०२

दिनांक - ०९/०६/२०१७

सुचक : मा.सचिन भोसले अनुमोदक : मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ : मा.सचिन भोसले, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव -

खिंवसरा पाटील व्यायामशाळा थेरगाव ही नागरिकांना व्यायामासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतु त्याचा उपयोग नागरिकांना होत नसून प्रशिक्षक नसल्या कारणाने तिथे कोणताही खेळाडू येत नाही. तरी सदर व्यायामशाळा आनंदपार्क मित्रमंडळ, थेरगांव यांना ११ महिने कराराने दरमहा र.रु.२,०००/- मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १९ विषय क्रमांक - ०३

दिनांक - ०९/०६/२०१७

सुचक : मा.बाळासाहेब ओव्हाळ अनुमोदक : मा.सचिन भोसले

संदर्भ : मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.सचिन भोसले यांचा प्रस्ताव –

मनपाच्यावतीने निगडी प्राधिकरण येथील बाहूबली व्यायामशाळा ही चालविली जाते. सदरची व्यायामशाळा निसर्गरत्न मित्रमंडळ, वाल्हेकरवाडी, चिंचवड पुणे ३३ या मंडळास ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रु.२,०००/- मनपा कडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास घेण्यास इच्छुक आहे. तरी मनपाची बाहुबली व्यायामशाळा निसर्गरत्न मित्रमंडळ वाल्हेकरवाडी, चिंचवड पुणे ३३ या मंडळास ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रु.२,०००/- मनपा कडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – २० विषय क्रमांक - ०४

दिनांक - ०९/०६/२०१७

सुचक : मा.बाळासाहेब ओव्हाळ अनुमोदक : मा.सचिन भोसले

संदर्भ : मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.सचिन भोसले यांचा प्रस्ताव –

मनपाची छत्रपती शिवाजी महाराज जलतरण तलाव, व्यायामशाळा से.२६, प्राधिकरण, आकुर्डी ही व्यायामशाळा नवनाथ मित्र मंडळ, आकुर्डी गाव पुणे ४११ ०३५ ही संस्था ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रु.२,०००/- मनपा कडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास घेण्यास इच्छुक आहे. तरी मनपाची छत्रपती शिवाजी महाराज जलतरण तलाव, व्यायामशाळा से.२६, प्राधिकरण, आकुर्डी ही व्यायामशाळा नवनाथ मित्र मंडळ, आकुर्डी गाव पुणे ४११ ०३५ या संस्थेस ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रु.२,०००/- मनपा कडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – २१ विषय क्रमांक - ०५

दिनांक - ०९/०६/२०१७

सुचक : मा.सचिन भोसले अनुमोदक : मा.भिमाबाई फुगे

संदर्भ : मा.सचिन भोसले, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती कार्यपत्रिका क्रमांक ५ ठराव क्रमांक १४ दिनांक २६/०५/२०१७ मध्ये मनपाचे जलतरण तलाव, लॉन टेनिस कोर्ट, बॅडमिंटन हॉल ५ वर्षे या पुढील “ भाडेकराराने चालविण्यास देणेस व याकामी भाडे दर निश्चित करण्याचे अधिकार

मा.अतिरिक्त आयुक्त / मा.सहा.आयुक्त यांना ” हा मजकूर वगळून त्या ऐवजी “ सेवाशुल्क तत्वावर ” हा मजकूर समाविष्ट करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( लक्ष्मणशेठ सोपान सस्ते )**
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य
व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/८७१/२०१७
दिनांक : ०९/०६/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 17 sub committee sabhapati.doc